दि. २०/०३/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद कॉलेज
बारामती

विषय: Study in India अंतर्गत ICC - Vietnam परिषदेचा अहवाल

महोदय

Study in India अंतर्गत इंडियन चेम्बर ऑफ कॉमर्स यांनी Vietnam येथे दिनांक १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत Vietnam देशामध्ये Nha Trang या शहरात Conference on Co-Operation Promotion India - South Central Provinces of Vietnam या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. त्या अंतर्गत Vietnam Delegation मध्ये आपल्या पुर्व परवानगीने आम्ही दिनांक १ फेब्रुवारी ते ४ फेब्रुवारी या कालावधीत Vietnam येथील Nha Trang येथील परिषदेस उपस्थित राहिलो होतो. दिनांक २६ फेब्रुवारीला पहाटे आम्ही मुंबई येथून Vietnam येथील Ho Chi Minh या शहरात पोहोचलो. दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ रोजी आम्ही Ho Chi Minh येथून Nha Trang city येथे पोहोचलो. दिनांक १ मार्च २०२३ रोजी परिषदेस सुरवात झाली.

सकाळच्या सत्रामध्ये ०९.३० ते ११.३० या वेळात Muong Thanh Luxury Hotel Nha Trang City येथे Plenary Session झाले. यामध्ये Chairman- khanh hoa provience , श्री मदन मोहन कॉन्सुल जनरल Vietnam. श्री. सत्यम रॉय चौधरी चेअरमन ICC नॅशनल एक्स्पर्ट कमिटी - Higher Education यांनी सहभाग घेतला. सर्व Indian delegates यांनी आपापल्या महाविद्यालयाचा परिचय करून दिला.

दुपारच्या सत्रामध्ये डिस्कशन सेशन आयोजित करण्यात आले तसेच बी टू बी मीटिंग आयोजित करण्यात आल्या यामध्ये वेगवेगळे सेक्शन करण्यात आले होते. यामध्ये ट्रेड इन्व्हेस्टमेंट हेल्थकेअर टुरिझम आयटी आणि एज्युकेशन अशा पद्धतीच्या मीटिंग आयोजित करण्यात आल्या. आम्ही एज्युकेशन सेक्शन मध्ये आयोजित आयोजित केलेल्या मीटिंगमध्ये सहभाग घेतला. वेगवेगळ्या विद्यापीठांमध्ये असणारे उपक्रम प्रत्येक टीमने यावेळी सांगितले. आपल्या महाविद्यालयाची व येथे चालणाऱ्या अभ्यासक्रमांची माहिती प्रा.डॉ. अविनाश जगताप यांनी दिली तसेच तेथे उपस्थित असलेल्या भारतातील व Vietnam मधील वेगवेगळ्या शैक्षणिक संस्थांचे

डेलिगेट्स आलेले होते. त्यांच्याशी संवाद साधला. या मीटिंगमध्ये एकूण ४१ डेलिगेट्स यांनी भाग घेतला. त्यावेळी या शहरात असलेल्या विद्यापीठातील प्रतिनिधींची आम्ही संवाद साधला.

दिनांक ०१/०३/२०२३ रोजी Gitarattan International Business School (GIBS) India, New Delhi या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला. दिनांक २ व ३ मार्च २०२३ रोजी स्थानिक विद्यापीठ तसेच वेगवेगळ्या शैक्षणिक संस्था यांना भेट देण्याचा कार्यक्रम होता. यामध्ये Nha Trang टुरिझम कॉलेज तसेच Nha Trang युनिव्हर्सिटी व्हिएतनाम व Nha Trang इंजिनिअरिंग कॉलेज येथे भेट दिली. या मधील Nha Trang युनिव्हर्सिटी येथील चान्सलर यांच्याशी चर्चा करून आपल्या महाविद्यालयातील इंग्रजी व फुड टेक्नॉलॉजी या विषयात सामंजस्य करार करण्यासाठी चर्चा केली. त्यांनी आपणास वरील विषयांसाठी सामंजस्य करार करण्यासाठी निमंत्रित केलेले आहे. दिनांक ४ मार्च २०२३ रोजी आम्ही हो ची मिन या शहरात आलो ही परिषद संपल्यानंतर आम्ही ६ मार्च २०२३ रोजी मुंबईत परत आलो.

सदर परिषद ही मुख्यत्वे विद्यार्थी व फॅकल्टी एक्स्चेंज या दोन विषयावरती आयोजित करण्यात आलेली होती त्यामुळे व्हियेतनाम मधील असलेले विद्यापीठ व आपले महाविद्यालय यामध्ये सामंजस्य करार करून विद्यार्थी व फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम आयोजित करण्यात येऊ शकतो.

आपण आम्हास दिलेल्या या संधीबद्दल मा. अनेकान्त एज्युकेशन सोसायटी व मा. प्राचार्य यांचे मनापासून आभार व्यक्त करत आहोत.

आपल्या माहितीसाठी सादर.

आपले विश्वासू

प्रा.डॉ. अशोक ई. कोळगे
भौतिकशास्त्र विभाग

प्रा.डॉ. अविनाश एस. जगताप
संख्याशास्त्र विभाग

सोबत

१) सामंजस्य कराराची प्रत
२) परिषदेचे वेळापत्रक
३) छायाचित्रे, माहितीपुस्तके
४) खर्चाचा तपशिल